(41) (53)

मा. तहसिलदार, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर यांचेकडील आदेश क्र. कावि.डेस्क-३/एलएनडी/एनएएसआर/९/२०१८, दि. ८/६/२०१८ मधील शर्ती व अटीस अधीन राहून

## अनुसूची-४

(नियम ७ पहा)

# सनद

### जमीनधारकासाठी

ज्याअर्थी तालुका **अकोले**, गांव **भंडारदरा**च्या स. नं. **१४१/४** पैकी **४००० चौ. मी.** क्षेत्राचे वरिष्ठधारक/भोगवटादार/कुळ (ज्याचा यापुढे अर्जदार असा उल्लेख करण्यात आला आहे आणि संदर्भानुसार अनुज्ञेय असल्यास त्या संज्ञेत त्याचे वारस, मृत्यूपत्र/व्यवस्थापक, कारभारी आणि अभिहस्तांकिनी यांचा समावेश होईल) असलेले मौजे **भंडारदरा, ता. अकोले** येथील रहिवासी **श्रीमती रंजना तानाजी लांडे व श्रीमती विजया निमनाथ चौधरी** यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ (ज्याचा यापुढे उक्त अधिनियम असा उल्लेख करण्यात आला आहे व त्या संज्ञेय संदर्भानुसार अनुज्ञेय असल्यास त्या अन्वये नियम व आदेश यांचा समावेश होईल) यांच्या कलम ४४ अन्वये यासोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये वर्णन केलेल्या जागेच्या नकाशावर लाल रंगाच्या अक्षरांनी दर्शविलेले स. नं. **१४१/४** पैकी **४००० चौ. मी.** क्षेत्रफळ असलेला किंवा त्यापेक्षा थोड्या कमी-अधिक मापाच्या असलेल्या भुखंडाचा (ज्याचा यापुढे उक्त भूखंड म्हणून उल्लेख करण्यात आलेला आहे) **वाणिज्य (रोड साईड रेस्टॉरंट)** प्रयोजनार्थ वापर करण्याच्या परवानगीकरीता अहमदनगरच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे (ज्याचा यापुढे जिल्हाधिकारी असा उल्लेख केला असून त्या संज्ञेत, या अधिकारपत्रान्वये त्याच्या शक्तिचा वापर करण्यासाठी आणि त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी नियुक्त करील अशा कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो) अर्ज केला आहे, त्याअर्थी आता याद्वारे असे प्रमाणित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या आणि त्याखालील नियमांच्या उपबंधास अधीन राहून आणि पुढील शर्तीवर उक्त भूखंड वापरण्याची परवानगी देण्यात येत आहे.

(१) **जमीन समतोल करणे व साफ करणे :-** ज्यासाठी परवानगी देण्यात आलेली आहे त्या विशिष्ट **वाणिज्य (रोड साईड रेस्टॉरंट)** प्रयोजनायोग्य होण्यासाठी आणि आरोग्यविषयक परिस्थितीस प्रतिबंध होण्यासाठी जमीन पुरेशी समतोल व साफ करण्यास अर्जदार बांधलेला असेल.

(२) **आकारणी :-** उक्त भूखंडाच्या बाबतीत यापूर्वी बसविण्यात येणाऱ्या आकारणीऐवजी अर्जदार शासनाला अकृषिक सारा दर चौ. मी. ला ०.१० पैसे या दराने ज्या अकृषिक कारणासाठी परवानगी दिली आहे, त्या कारणासाठी अकृषिक परवानगी दिल्याचा तारखेपासून भरावा. तसेच अकृषिक दर हा सुधारीत दर येईपर्यंत अंमलात राहील. तसेच सदरहू

...२/-

अकृषिक सारा ज्या-ज्या वेळेस अकृषिक सारा बदलेल त्या प्रमाणे शेतसारा बदलता राहील.

**(३) वापर :-** अर्जदाराने **वाणिज्य (रोड साईड रेस्टॉरंट)** (ज्या प्रयोजनासाठी परवानगी देण्यात आलेली असेल ते विशिष्ट प्रयोजन लिहावे) या व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी उक्त जमिनीचा आणि तिच्यावर उभारलेल्या किंवा उभारावयाच्या इमारतीचा जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व मंजुरीशिवाय वापर करता कामा नये.

**(४) बांधकामाबाबतची कालमर्यादा :-** अर्जदार या अधिकारपत्राच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत उक्त भूखंडावर भरीव स्वरुपाचे पक्के बांधकाम सुरु केले पाहिजे. तसे त्याने न केल्यास मा. जिल्हाधिकाऱ्यांकडून वेळोवेळी मुदत वाढवण्यात आली नसेल तर, देण्यात आलेली परवानगी व्यपगत (म्हणजे रद्द) झाल्याचे समजण्यात येईल.

**(५) कर देण्याबाबतचे दायित्व :-** अर्जदाराने उक्त जमिनीवर आकारण्यायोग्य सर्व करपट्ट्या व उपकर दिले पाहिजेत.

**(६) शास्तविषयक खंड :-**

(अ) अर्जदाराने पुरोगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास उक्त अधिनियमाच्या उपबंधान्वये अर्जदार ज्या शिक्षेस पात्र होईल, त्यास बाधा न आणता जिल्हाधिकाऱ्यांस तो निर्वेशित करील असा दंड आणि आकारणीची रक्कम भरल्यावर उक्त भूखंड अर्जदाराच्या ताब्यात ठेवण्याचे चालू ठेवता येईल.

(ब) उपखंड (अ) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी या अधिकारपत्राच्या उपबंधाविरुध्द उभारण्यात असलेली किंवा वापरण्यात आलेली कोणतीही इमारत किंवा कोणतेही बांधकाम त्याबाबतीत जिल्हाधिकाऱ्यांनी विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत काढून टाकण्याबाबत किंवा त्यात बदल करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी निर्देश देणे वैध असेल आणि निर्दिष्ट मुदतीत कशा प्रकारे (इमारत किंवा बांधकाम) काढून टाकण्यात आलेली नाही किंवा त्यात बदल करण्यात आला नाही तर त्याला ते काढून टाकण्याची किंवा त्यात बदल करण्याची व्यवस्था करता येईल आणि त्याबाबतचा खर्च अर्जदाराकडून जमीन महसूलाची थकबाकी करता येईल.

**(७) अधिनियमांचा उपबंध लागू करणे :-** या उपबंधीत केले असेल त्या व्यतिरिक्त हे अधिनियमांच्या आणि उपबंधाच्या अधीन असेल.

## परिशिष्ट-१ (नकाशा)

स्वतंत्र पृष्ठावर पहा व सोबत नकाशा प्रत जोडली आहे.

## परिशिष्ट-२

४) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ अन्वये नियोजन प्राधिकाऱ्याने मान्यता दिलेल्या आराखड्यास अनुसरुन अर्जदाराने भूखंडावर काम केले पाहिजे.

५) अर्जदाराने इमारतीचे आणि नियंत्रण रेषेच्या प्रमाणाचे पालन केले पाहिजे आणि सोबत नकाशातील लाल रंगाने चिन्हांकित केलेले क्षेत्र मोकळी जागा म्हणून ठेवले पाहिजे.

६) हे अधिकारपत्र पुढील विशेष शर्तीस अधिन राहील.

i) मंजूर रेखांकन आराखड्यास नियोजन प्राधिकरण यांचे आगाऊ परवानगीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.

ii) प्रस्तुत जमिनीत गटारी, अंतर्गत रस्ते, जोडरस्ते इ. पूर्ण करून स्थानिक प्राधिकरणाचे ताब्यात दिल्याशिवाय भूखंडाची निर्गती करता येणार नाही.

iii) सहाय्यक संचालक, नगर रचना, अहमदनगर यांचे पत्रातील अट क्र. ३ नुसार जिल्हा निरीक्षक, भूमी अभिलेख यांच्याकडील प्रमाणित अभिन्यास तसा नकाशा अंतिम मंजुरीसाठी परवानगी दिलेल्या तारखेपासून एक वर्षाच्या आत सादर करावा.

iv) विकासापूर्वी प्रश्नाधीन जमिनीतील प्लॉटची विक्री केल्यास ती बेकायदेशीर ठरेल.

v) रेखांकन नकाशा दर्शविल्याप्रमाणे खुली ठेवण्याची जागा कायमस्वरुपी खुली ठेवावी व विकसन करून स्थानिक प्राधिकरणाच्या ताब्यात द्यावी.

vi) अंतर्गत रस्ते सभोवतालच्या जमिनींना प्रवेशमार्ग म्हणून वापरू देणे आवश्यक आहे.

vii) स्थानिक प्राधिकरणाचे नियमानुसार सांडपाणी, पिण्याचे पाण्याची व्यवस्था करणे बंधनकारक राहील.

viii) लगतचे भूधारकांच्या सुविधेत बाधा येणार नाही, याची दक्षता घ्यावी.

ix) अर्जदाराने दिलेली माहिती चुकीची आढळल्यास परवानगी रद्द समजण्यात यावी.

x) जर रेखांकनामध्ये स्थानिक प्राधिकरणाची पाईपलाईन जात असेल तर त्यावर बांधकाम करता येणार नाही.

xi) पिण्याचे पाणी, सांडपाणी, गटार, अंतर्गत रस्ते या सुविधा उपलब्ध केल्याशिवाय भूखंड विक्री करू नये.

xii) सभोवताली व खुल्या जागेत झाडे लावावीत.

xiii) भविष्यकाळात जागेच्या चतु:सीमा व मालकी हक्काबाबत वाद निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी अर्जदार यांच्यावर राहील.

...५/-

या गोष्टींची साक्ष म्हणून अकोले तहसिलदारांनी महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने आपली सही केली आणि आपली पदीय मोहोर लावली आणि अर्जदाराने सुध्दा येथे तारीख १०/१२/२०१८ रोजी आपली सही केली आहे.

**साक्षीदार :-** अर्जदार

(१) सही : [signature]

नाव : दिनेश सखाराम साबळे

पत्ता : मु/पो- राजूर ता. अकोले जि. अहमदनगर

(२) सही : [signature]

नाव : अजय लक्ष्मण लांडे

पत्ता : मु/पो- राजूर ता. अकोले जि. अहमदनगर

[signature]
**श्रीमती रंजना तानाजी लांडे**

**श्रीमती विजया निमनाथ चौधरी**
[signature]

**तहसिलदारांची सही व मोहोर**

आम्ही असे जाहीर करतो की, जिने या सनदेवर सही केली आहे, ती अ, ब ही व्यक्ती आमच्या वैयक्तिक माहितीप्रमाणे, ती जी व्यक्ती असल्याचे म्हणते आले, तीच व्यक्ती आहे आणि तिने आमच्या समक्ष आपली सही केली आहे.

तहसिलदार अकोले ता. अकोले, जि. अ. नगर

[signature]
तहसिलदार, अकोले

प्रत :- मा. जिल्हाधिकारी सो, अहमदनगर यांचेकडेस सविनय सादर.

प्रत :- मा. उप विभागीय अधिकारी सो, संगमनेर भाग, संगमनेर यांचेकडेस सविनय सादर.

प्रत :- उप अधिक्षक, भूमी अभिलेख, अकोले यांचेकडेस जरुर त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत :- कामगार तलाठी, भंडारदरा, ता. अकोले यांचेकडेस योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.